# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक: 19.04.2024** **वार: शुक्रवार**

---

**प्रचार**

लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराला आता रंग चढत असून महाविकास आघाडीचे मावळ लोकसभा मतदार संघातील उमेदवार संजोग वाघिरे यांनी नुकतंच कर्जत विधानसभा क्षेत्रात संवाद मेळाव्याचं आयोजन केलं होतं. यावेळी त्यांनी नागरिक आणि व्यावसायिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

भारतीय जनता पार्टीचे पुण्याचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी आज दीपबंगला चौक ते बारामती होस्टेल दरम्यान पदयात्रा काढली आणि नागरिकांशी संवाद साधला. विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पार्टीला साथ देण्याचं आवाहन त्यांनी केलं. महायुतीच्या घटकपक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते या पदयात्रेत सहभागी झाले होते.
काँग्रेसचे पुणे मतदारसंघाचे उमेदवार रविंद्र धंगेकर यांनीही प्रचारासाठी पदयात्रा काढून मतदारांच्या भेटीगाठी घेण्यावर भर दिला. महाविकास आघाडीतल्या घटक पक्षांचे कार्यकर्ते, पदाधिकारी या पदयात्रेत सामील झाले होते.

**मतदार जन जागृती**

निगडी प्राधिकरण इथल्या ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य लोकसभा निवडणुकीसाठी स्वतः मतदान करणार असून मित्र मंडळी,नातेवाईक आणि परिसरातील नागरिकांनीही मतदान करावं यासाठी जागृती करणार

आहेत. जेष्ठ नागरिक संघाच्या ३३व्या वर्धापन दिनी संघाच्या अध्यक्षा अर्चना वर्टीकर यांनी ही माहिती दिली.

**व्याख्यान**

भ्रष्टाचारमुक्त भारत हाच खऱ्या अर्थाने विकसित भारत असेल; असं प्रतिपादन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी काल पुण्यात केलं. विज्ञान भारतीचे माजी राष्ट्रीय संघटन सचिव दिवंगत जयंत सहस्त्रबुद्धे यांच्या जन्मदिनानिमित्त 'जयंतस्मृती' व्याख्यानात ते बोलत होते. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, विवेक प्रकाशन आणि विज्ञान भारती पश्चिम महाराष्ट्र प्रांत यांनी या कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. पश्चिम महाराष्ट्र विज्ञान भारतीचे माजी अध्यक्ष आणि इस्रोचे माजी समूह संचालक डॉ. सुरेश नाईक यांनी लिहिलेल्या 'इस्रोची विस्मयजनक अवकाशयात्रा' या पुस्तकाचं प्रकाशनही यावेळी झालं.

**भिडे पुरस्कार**

ज्येष्ठ पत्रकार वरुणराज भिडे पत्रकारिता पुरस्कारांची घोषणा काल करण्यात आली. महाराष्ट्र टाईम्सचे मुंबईतील विशेष वार्ताहर समर खडस यांना मुख्य पुरस्कार दिला जाणार आहे. तर 'आश्वासक पत्रकारिते'साठी 'आज का आनंद'चे मुख्य वार्ताहर शैलेश काळे  'झी 24 तास' वाहिनीचे ज्येष्ठ बातमीदार अरुण मेहेत्रे आणि सकाळचे मंचरचे  बातमीदार डी. के. वळसे पाटील यांना सन्मानित केलं जांणार आहे. येत्या रविवारी पुण्यात या पुरस्कारांचं वितरण होईल अशी माहिती संस्थेचे विश्वस्त अंकुश काकडे यांनी दिली.

**बैठक सूचना**

पुणे शहराच्या मध्यवर्ती भागाच्या नदी पात्रातील पूररेषेच्या आत येणारी सर्व अतिक्रमणं महापालिका आणि जलसंपदा विभागानं त्वरित हटवावीत असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिले आहेत. येत्या महिनाभरात ही कार्यवाही पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आगामी

पावसाळ्याच्या तोंडावर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समितीची नुकतीच बैठक झाली. यावेळी पुणे शहरासह जिल्ह्यातील संभाव्य नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाचा या आढावा घेण्यात आला.

<u>**चित्रपट महोत्सव**</u>

संवाद पुणेतर्फे पुण्यात आजपासून येत्या २५ तारखेपर्यंत रौप्य महोत्सवी बालचित्रपट महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. सिटी प्राईड कोथरूड इथं लहान मुलांच्या हस्ते हवेत फुगे सोडून याचं उद्घाटन करण्यात आलं.

<u>**वाहन क्रमांक**</u>

आपल्या वाहनांना आपल्या आवडीचे नोंदणी क्रमांक मिळावेत यासाठी अतिरिक्त पैसे मोजण्याची तयारी असणाऱ्या वाहन मालकांकडून पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाला या वर्षात ५० कोटी रुपयांचं उत्पन्न मिळालं आहे. गेल्या वर्षीपेक्षा हे उत्पन्न किमान ११ कोटी रुपयांनी जास्त असल्याचं प्रादेशिक परिवहन अधिकारी संजीव भोर यांनी सांगितलं.

<u>**सट्टा**</u>

आयपीएल क्रिकेट सामन्यावर सट्टा लावणाऱ्या दोघांना गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकाने अटक केली आहे. पुण्यात सॅलिसबरी पार्क परिसरात ही कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून पाच मोबाइल संच जप्त करण्यात आले आहेत.

<u>**क्रीडा**</u>

पुण्यात सुरू असलेल्या दिवंगत कॅप्टन शिवरामपंत दामले करंडक आंतरक्लब क्रिकेट स्पर्धेत पुणे क्रिकेट ॲकॅडमीने स्पेशलाईज्ड क्रिकेट क्लबचा १० धावांनी पराभव केला. अन्य एका  सामन्यात साई क्रिकेट ॲकॅडमीने जेएम क्रिकेट ॲकॅडमीचा ८ गडी राखून सहज पराभव केला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश अंशतः ढगाळ असून वातावरणात प्रचंड उष्मा जाणवत आहे. आज कमाल तापमान ३९ अंश तर किमान तापमान 24 पूर्णांक 7 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही आकाश अंशतः ढगाळ असेल; तसंच पावसाचाही अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**